सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १४ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाराष्ट्राचे सुपुत्र न्या. बी. आर. गवईंनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ नवी दिल्ली**

न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून आज शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवन येथे त्यांना शपथ दिली. माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना हे काल १३ मे रोजी निवृत्त झाले. बी. आर. गवई हे आता २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भारताचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहणार आहेत.

न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून आज शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवन येथे त्यांना बुधवारी शपथ दिली.

### अमरावती ते दिल्ली, असा होता प्रवास

माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना हे १३ मे रोजी निवृत्त झाले. भूषण गवई हे आता २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भारताचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहणार आहेत. २००७ साली सरन्यायाधीश म्हणून शपथ घेणारे न्या. के.जी. बालाकृष्णन यांच्यानंतर न्या. गवई हे दुसरे दलित व्यक्ती ठरणार आहेत. त्यांच्या शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते.

सुमारे दहा मिनिटे हा शपथविधी सोहळा चालला. यावेळी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, निवृत्त सरन्यायाधीश संजीव खन्ना, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाश सिंह, विधी मंत्री अर्जुन राम मेघवाल, उद्योग मंत्री पीयुष गोयल, रसायन विभागाचे मंत्री जेपी नड्डा यांच्यासह सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

बी. आर. गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी झाला असून ते महाराष्ट्रातील अमरावती येथील रहिवासी आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि बिहार व केरळचे माजी राज्यपाल दिवंगत आर. एस. गवई यांचे ते पुत्र आहेत. महाराष्ट्रातील अमरावती येथील रहिवासी असलेले न्यायमूर्ती गवई १६ मार्च १९८५ रोजी बार कौन्सिलमध्ये सामील झाले आणि १९८७ पर्यंत माजी महाधिवक्ता आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राजा एस. भोसले यांच्याबरोबर त्यांनी काम केले. १९९० नंतर त्यांनी प्रामुख्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर संवैधानिक आणि प्रशासकीय कायद्यात प्रॅक्टिस केली. ते नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे स्थायी वकील देखील होते.

## भारताविरोधातील कट उधळला! शोपियान चकमकीत ठार झालेल्या ३ दहशतवाद्यांकडून मोठा शस्त्रसाठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४जम्मू**

भारत-पाकिस्तान युद्धविराम घोषणेनंतर ४८ तासांत दक्षिण काश्मीरातील शोपियान जिल्ह्यात दहशतवादी आणि सुरक्षा जवानांमध्ये चकमक झाली. यात लश्कर-ए-तोयबाच्या ३ दहशतवाद्यांचा खात्मा झाला. या ठार झालेल्या दहशतवाद्यांकडून सुरक्षा यंत्रणांनी मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. १३ मे रोजी शोपियानातील केलर इथल्या जंगलात सुरक्षा दलाने ही कारवाई केली होती.



सीमेवरील गोळीबार बंद होताच सुरक्षा दलांनी जम्मू काश्मीरात दहशतवाद्यांना ठेचण्याचं काम सुरू केले आहे. त्यात मंगळवारी सकाळी शोपियान जिल्ह्यात दहशतवादी आणि सुरक्षा जवान यांच्यात चकमक झाली. यात लश्कर-ए-तोयबाचा कमांडर शाहीद कुट्टे आणि अदनान शफीसह ३ दहशतवादी मारले गेले. यातील तिसरा दहशतवादी अहसान-उल-हक शेख हा पुलवामातील रहिवासी आहे. या दहशतवाद्यांकडून दारुगोळा, हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. त्यात एके ४७, मॅगजीन, ग्रेनेड आणि अन्य शस्त्रांचा समावेश आहे.

याबाबत जम्मू काश्मीर पोलिसांनी सांगितले की, मंगळवारी सकाळी शोपियान जिल्ह्यातील केलर परिसरात काही दहशतवादी लपल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तात्काळ पोलिसांकडून स्पेशल ऑपरेशन ग्रुप आणि सैन्याचे २० राष्ट्रीय रायफल्स, सीआरपीएफ जवान तिथे दाखल झाले. परिसरात सर्च ऑपरेशन घेण्यात आले. सुरक्षा यंत्रणांनी वेढा घातलाय समजताच दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. त्याला सुरक्षा जवानांनीही चोख उत्तर दिले. या चकमकीत लश्कर-ए-तोयबाचे ३ दहशतवादी मारले गेले.

## बीएसएफ जवानाची पाकिस्तानी रेंजर्सच्या तावडीतून सुटका

### पहलगाम हल्ल्यानंतर अनवधानाने गेला होता सीमेपार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४जम्मू**




पहलगाम हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी एलओसीवर तैनात असलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या जवानाला पाकिस्तानी रेंजर्सनी ताब्यात घेतले होते. हा जवान आज परत मायदेशी आला आहे. अटारी बॉर्डरवर पाकिस्तानने जवान पूर्णम कुमार शॉ यांचा ताबा भारताकडे सोपविला आहे.

शेतकऱ्यांचे संरक्षणासाठी ड्युटीवर असताना चुकून पूर्णम शॉ गेल्या आठवड्यात आंतरराष्ट्रीय सीमापार गेले होते. काहीच माहिती मिळत नसल्याने शॉ यांची गर्भवती पत्नी फिरोजपूरला पोहोचली होती. पतीला सोडविण्यासाठी काय काय पाऊले उचलली जात आहेत हे जाणून घेण्यासाठी ती बीएसएफच्या कॅम्पमध्ये आली होती. बीएसएफच्या अधिकाऱ्यांकडून संतोषजनक माहिती नाही मिळाली तर मी दिल्लीमध्ये केंद्रीय गृह मंत्रालय आणि अन्य सरकारी अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी जाणार आहे, असे त्यांच्या पत्नीने म्हटले होते. २३ एप्रिल रोजी शॉ पाकिस्तानच्या ताब्यात गेले होते. आज २० दिवसांनी त्यांची सुटका करण्यात यश आले आहे.

सीमेजवळ काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या एका गटाचे संरक्षण करण्यासाठी शॉ यांची ड्युटी लागली होती. यावेळी ते आराम करण्यासाठी जवळच्याच झाडाखाली गेले. यावेळी त्यांनी चुकून आंतरराष्ट्रीय सीमा पार केली. अनवधानाने पाकिस्तानी हद्दीत गेले आणि पाकिस्तानी रेंजर्सनी त्यांना ताब्यात घेतले, असे बीएसएफ अधिकाऱ्यांनी सांगितले. शॉ हे पंजाबमधील फिरोजपूर सीमेवर बीएसएफच्या १८२ व्या बटालियनमध्ये तैनात आहेत.

शॉला पाकिस्तानने ताब्यात घेतल्याच्या दुसऱ्या दिवशी भारतीय आणि पाकिस्तानी सीमा दलांनी ध्वज बैठक आयोजित केली होती परंतु त्याच्या कुटुंबाला अधिक माहिती देण्यात आली नव्हती. अखेर आज सीमेवर शांतता प्रस्थापित झाल्यावर शॉ यांची सुटका करण्यात आली आहे.

## राहुल गांधींना दिलासा; नागरिकत्वाला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नवी दिल्ली**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नागरिकत्व प्रकरणात अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने याचिकाकर्त्याला पुनर्विचार याचिका दाखल करण्याची परवानगी दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ५ मे रोजी याच वादावरील याचिकाकर्त्याची याचिका उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने फेटाळून लावली होती. नवीन याचिका दाखल करताना, काही नवीन पुरावे सादर केल्याचा दावाही करण्यात आला. या याचिकेवर निर्णय होईपर्यंत राहुल गांधींच्या परदेश प्रवासावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

ही याचिका कर्नाटकातील एस विघ्नेश शिशिर यांनी दाखल केली होती. शिशिर यांनी राहुल गांधी यांच्या नागरिकत्वावर प्रश्न उपस्थित केले होते आणि या प्रकरणाची केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) चौकशी करण्याची मागणी केली होती. राहुल गांधींकडे युनायटेड किंग्डम (यूके) चे नागरिकत्व आहे, असा दावा याचिकेत करण्यात आला होता. राहुल गांधींकडे ब्रिटिश नागरिकत्व असल्याचे पुरावे त्यांच्याकडे आहेत, असा आरोप याचिकाकर्त्याने केला आहे.

## पुणे विमानतळावर खळबळ, तब्बल १० कोटींचे ड्रग्ज जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४पुणे**

पुणे आंतरराष्ट्रीर विमानतळावर महसूल गुप्तचर विभागाने मोठी कारवाई केली. विमानतळावर तब्बल १० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी सापळा रचून २ जणांना महसूल गुप्तचर विभागाने अटक केली. याप्रकरणी महसूल गुप्तचर विभागाने मुंबईतून आणखी एकाला ताब्यात घेतले आहे. बँकॉक ते पुणे असा प्रवास करून आलेल्या प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास सध्या सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बँकाकहून पुणे आंतराष्ट्रीय विमानतळावर सोमवारी दुपारी दोघे जण उतरले. त्यांच्याकडे डॅग्ज असल्याची माहिती 'डीआरआय'च्या मुंबई पथकाला मिळाली होती. त्यानुसार या माहितीची खातरजमा केल्यानंतर महसूल गुप्तचर विभागाच्या पथकाने पुणे विमानतळावर सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले आणि त्यांची चौकशी केली. यावेळी तपासणी केली असता त्यांच्याकडे ड्रग्ज सापडले.

चौकशीदरम्यान त्यांच्याकडे असलेल्या सामानाची तपासणी करण्यात आली. तेव्हा प्लास्टिकच्या पिशवीत ड्रग्ज सापडले. चौकशीत मुंबईतील एकाकडे ड्रग्ज विक्रीसाठी देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. याच प्रकरणात डीआरआय'च्या पथकाने मुंबईतून एकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून देखील ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. या कारवाईत १० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले असून आंतराष्ट्रीय बाजारपेठेत जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची किंमत १० कोटी रुपये इतकी आहे.

## आमच्या तिघांत आता स्पीड ब्रेकरला जागा नाही : देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

आता मी तिघे एकत्रित आहोत. आम्ही तिघांनी सुसाट वेगाने आमची विकासाची एक्सप्रेस सुरू केलेली आहे. आता त्यामध्ये कोणीही स्पीडब्रेकर आणू शकत नाही. कोणाला बुस्टर द्यायचा असेल तर वेगळी गोष्ट आहे. मात्र स्पीड ब्रेकरला आता आमच्यात जागा नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. महामुंबई मेट्रो ९ चा चाचणी टप्पा आज पूर्ण झाला. या वेळी ते माध्यमांशी बोलत होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील आता आमच्या तिघांची मेट्रो बुलेटच्या स्पीडने काम करणार असल्याचा दावा केला आहे. आता तर आम्ही तिघे एकत्र आहोत. त्यामुळे बुलेट ट्रेनच्या स्पीडने आम्ही सर्व कामे करणार असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. त्यामुळे कोणीही मनात शंका बाळगून नये. आमचा आता डेव्हलपमेंट हा एकच अजेंडा असल्याचे देखील एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

मेट्रो प्रकल्पाच्या बाबत पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना आंदोलन करावे लागले होते. मात्र, ज्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले त्यांच्या काळात आम्हीदेखील मंत्रिमंडळात होतो. त्यावेळी या मेट्रोला मान्यता मिळाली. २०१८ मध्ये ही मान्यता मिळाली असून तेव्हापासून मेट्रोचे काम मोठ्या प्रमाणात सुरू झाले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मात्र, त्यानंतरच्या मधल्या काळात स्थगिती सरकार आले. त्यावेळी थोडसा ब्रेक या प्रकल्पाला लागला होता. आता पुन्हा एकदा महायुती सरकार आल्यानंतर सर्व स्पीड ब्रेकर काढून टाकले तसेच सर्व अडथळे दूर केले आहेत. मुंबईमध्ये नेटवर्कला चालना देण्यात आली. त्यामुळेच खऱ्या अर्थाने मेट्रोचे नेटवर्क उभे राहिले असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# संघर्षविरामावरून अनाठायी गोंधळ

*'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत भारताने पाकिस्तानला योग्य तो धडा शिकवला आहे. तरीही संघर्षविरामानंतर समाजमाध्यमांमधून काही अनाठायी प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पण आपण लक्षात घेतले पाहिजे की, भारताने आपल्या सैन्याला पाकिस्तानी लष्करी तळ काबीज करण्याचे किंवा पाकव्याप्त भारतीय काश्मीरला प्रजासत्ताक काश्मीरमध्ये परत जोडण्याचे आदेश अथवा उद्दिष्ट दिलेलेच नव्हते.ऑपरेशन सिंदूरच्या शानदार यशाबद्दल भारतीय जनतेने एकमताने सशस्त्र दलांचे आणि राजकीय नेतृत्वाचे अभिनंदन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही भारताच्या शूर जवानांच्या अतुलनीय कामगिरीला सलाम करून हे ऑपरेशन राष्ट्राला समर्पित केले. ज्या पद्धतीने आपल्या सैन्याने दहशतवादी अड्ड्यांवर कारवाई केली आणि नागरी लोकसंख्येला स्पर्शही केला नाही, ते लष्करी आणि तांत्रिक क्षमतेचे तसेच संयमाचे एक अद्भुत उदाहरण होते. पण त्यानंतर झालेल्या युद्धबंदीवर काही निवडक मतभेद करणारे आवाज आभासी क्षेत्रात विदूषकाची भूमिका बजावत आहेत. 'ऑपरेशन सिंदूर'च्या दुसर्या टप्प्याच्या ४८ तासांच्या आत आपल्या सैन्याच्या सुवर्ण यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे योग्य नाही. पण तरीही भारतीय सैन्याच्या आक्रमकतेनंतर झालेल्या युद्धबंदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. आपण लष्करी आक्रमकता सुरू ठेवायला हवी होती आणि पाकिस्तानमध्ये घुसून कारवाई करायला हवी होती, अशी अनेकांची भूमिका होती.*

*वस्तुतः कोणताही देश लष्करी कारवाई करण्यापूर्वी निश्चितच ध्येय निश्चित करतो. 'ऑपरेशन सिंदूर'च्या दुसर्या टप्प्याचे मुख्य ध्येय अजिबात आक्रमक नव्हते. केवळ दहशतवादी अड्ड्यांवरील प्रभावी हल्ल्यामुळे घाबरलेल्या पाकिस्तानच्या, युद्धखोर लष्करप्रमुखांच्या बेजबाबदार कृतींना योग्य उत्तर देणे हाच या मिशनचा उद्देश होता. दोन्ही देशांनी ही मर्यादित चकमक संघर्षाच्या कक्षेतच मर्यादित राहू दिली. भारताने पाकिस्तानच्या हल्ल्यांना ड्रोन, क्षेपणास्त्रे आणि लढाऊ विमानांनी त्यांच्याच भाषेत प्रत्युत्तर दिले.*

*राजस्थानच्या सीमेवर युद्धसरावाच्या बहाण्याने पाकिस्तानने आपल्या सैन्याचे टँक, चिलखती वाहने आणि तोफा तैनात केल्या. पण भारतीय सैन्याला पुढच्या भागात पोझिशन घेण्याचे कोणतेही आदेश दिले नाहीत. आपल्या सीमेच्या संरक्षणाची पहिली ओळ असलेल्या बीएसएफलाही (सीमा सुरक्षा दल) गृहमंत्री अमित शहा यांनी फक्त सतर्क राहण्याचे आणि गरज पडल्यास योग्य कारवाई करण्याचे आदेश दिले होते.*

*या सर्व तथ्यांवरून असे दिसून येते की, भारताने आपल्या सैन्याला पाकिस्तानी लष्करी तळ काबीज करण्याचे किंवा पाकव्याप्त भारतीय काश्मीरला आपल्या प्रजासत्ताक काश्मीरमध्ये परत जोडण्याचे आदेश अथवा उद्दिष्ट दिलेलेच नव्हते. त्यामुळेच सर्व प्रकारची चिथावणी देऊनही भारताने संयम गमावला नाही. तसेच अणुयुद्धाची धमकी देण्यासारखे बालिश कृत्य करण्यापासून परावृत्त केले.पाकिस्तानने भूज आणि जैसलमेरपासून श्रीनगर आणि अवंतीपुरापर्यंत ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी भारताच्या सीमेवर हल्ला करण्यात पुढाकार घेतला. पण भारतीय सैन्याच्या संयुक्त कमांडरने केलेली प्रत्युत्तराची कारवाई पाकिस्तानचे मनोबल तोडण्यात पूर्णपणे यशस्वी झाली. याचा पुरावा म्हणजे पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी (डीजीएमओ) त्यांच्या भारतीय समकक्षांना फोनवरून युद्धबंदीची विनंती केली. १९७१ च्या ढाका स्टाईलने पाकिस्तानी सैन्याने शरणागती न मानल्याने किंवा पाकिस्तानी लष्करप्रमुख मौलाना मुनीर यांनी त्यांच्या कृत्यांबद्दल माफी न मागितल्याने जे लोक रागावले आहेत किंवा नाराज आहेत, त्यांनी वस्तुस्थिती समजून घ्यायला हवी.*

*१९७१ मध्ये ९८ हजार पाकिस्तानी सैनिकांनी ज्या परिस्थितीत शरणागती पत्करली, ती परिस्थिती पूर्णपणे वेगळी होती. भारताचे ध्येय कधीही पाकिस्तानचा कोणताही भाग ताब्यात घेणे नव्हते. आम्ही पाकिस्तानकडून फक्त 'जगा आणि जगू द्या' अशी मागणी करतो. प्रत्येक भारतीयाला पाकव्याप्त काश्मीर भारतात विलीन करण्याची इच्छा आहे हे नाकारता येत नाही. पण आताच्या लष्करी कारवाईचा उद्देश केवळ बचावात्मक होता.*

# विभागीय लोकशाही दिनात ३१ प्रकरणांवर सुनावणी ; सहा प्रकरणे निकाली

## प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करा- विभागीय आयुक्त श्वेता सिंघल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** लोकशाही दिनासाठी प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित अर्जदारांना कळविणे प्रशासनाचे काम आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी दाखल झालेल्या प्रकरणांसंबंधी मुद्देनिहाय चौकशी, तपासणी करुन तत्काळ निराकरण करावे, तक्रार अयोग्य असल्यास तसे अर्जदारास कळवावे. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनी येवू नये, याची संबंधित विभाग प्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी आज येथे दिले.

यावेळी विभागीय लोकशाही दिनात दाखल एकूण ३१ प्रकरणांवर चर्चा करण्यात आली असून सहा प्रकरणे निकाली काढण्यात आली. तर उर्वरित प्रकरणांवर पंधरा दिवसांत आवश्यक कार्यवाही करुन अंतीम अहवाल सादर करण्याच्या सूचना श्रीमती सिंघल यांनी संबंधित विभागाला दिल्या.

विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात श्रीमती सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली आज लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, उपायुक्त अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, राजू फडके, तहसीलदार प्रज्ञा काकडे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांच्यासह पोलीस, महापालिका, महसूल, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी तसेच पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व अधिकारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून यावेळी बैठकीला उपस्थित होते.

विभागीय लोकशाही दिनासाठी सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या १२ स्वीकृत अर्जांपैकी दोन प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच १९ अस्वीकृत अर्जांपैकी ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. एकूण ३१ अर्जांवर सविस्तर चर्चा आजच्या विभागीय लोकशाही दिनात झाली.

लोकशाही दिनासाठी विभागातून उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.

प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करुन अंतिम अहवाल तत्काळ सादर करण्यात यावा. तक्रार अयोग्य असल्यास खारिज करुन संबंधितांना कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त श्रीमती सिंघल यांनी संबंधितांना दिले. मागील प्रलंबित प्रकरणे नवीन लोकशाही दिनात सुनावणीसाठी येवू नये.

लोकशाही दिनासाठी दाखल केलेल्या तक्रार अर्जांवर वेळेत कार्यवाही होण्यासाठी संबंधित विभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या




## घरोघरी मुलं लठ्ठ का होत आहे? मुलांच्या आरोग्याची मोठी समस्या, वाढलेल्या वजनाचे परिणाम धोकादायक

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक –** आजकाल सर्वांमध्येच पण विशेषतः तरुण मुलांमध्ये आळस, कंटाळा, एकटेपणा, नैराश्य, लठ्ठपणा, निद्रानाश या काही समस्या वाढत आहेत. या समस्या नेमक्या ऐन तारुण्यात मुलांना का छळतात याची कारणं आधी पाहूया.१. तरुण मुलं उशिरा झोपतात, अनेकदा मध्यरात्री काहीतरी अनहेल्दी खातात, मग झोपतात. व्यायामाचा अभाव. मग दिवसा त्यांना आळस येतो. कष्ट नाही, त्यामुळे कुठलेही कष्टाचे कार्य करावेसे वाटत नाही, कमी कॅलरीज जळतात व त्याचे रूपांतर फॅट्समध्ये होतं. बिघडलेली दैनंदिन दिनचर्या हे एक महत्त्वाचं कारण आहे.




पालकांचे होणारे दुर्लक्ष. आई-बाबांना मुलांसाठी फार वेळ नसतो, ते नोकरी उद्योगात अडकलेले, आर्थिक गरजा मोठ्या. पालक आणि मुलांमध्ये सहवास आणि संवाद कमी. मुलांच्या आणि पालकांच्या वेळेचा मेळ बसत नाही. मुलांमध्ये एकटेपणाची भावना रुजू लागते. मुलांकडे मोकळा वेळच नसतो. भरपूर मुलं खेळतात असं होतच नाही. जो वेळ उरतो तो स्क्रीन टाइम खाऊन टाकतो.

**परिणाम काय?**

१. सध्या लठ्ठपणा ही समस्या मोठ्या प्रमाणात वाढते आहे. युनिसेफच्या वर्ल्ड ओबेसिटी ॲटलिस्टच्या म्हणण्यानुसार भारतामध्ये २०३० पर्यंत लठ्ठ लोकांची संख्या २.७ कोटी एवढी असेल असा अंदाज वर्तवला जात आहे. (म्हणजेच दहापैकी एक मूल लठ्ठ असेल.)

२. भारत १८३ देशांमध्ये लठ्ठपणाच्या यादीत ९९ व्या स्थानावर आहे. अतिखाण्यामुळेच लठ्ठपणा वाढतो आहे असे नाही, तर अयोग्य अन्न आणि जे खाल्ले ते न पचवणे, सतत बसून, अथवा पडून राहणे, चुकीचे समज यामुळे हे प्रमाण वाढत आहे.

३. या लठ्ठपणावर त्वरित उपाय करणे गरजेचे आहे. कारण लठ्ठपणा आपल्यासोबत इतर अनेक समस्या घेऊन येतो.

४. नैराश्य, निद्रानाश, तेरा प्रकारचे कर्करोग, हृदयरोग, फुफ्फुसांचे विकार, टाइप टू डायबिटिस, फॅटी लिव्हर, गॉल स्टोन, महिलांमध्ये पॉलिसीस ओवरी, ब्रेन प्रॉब्लेम, हायपर टेन्शन, बीपी प्रॉब्लेम, किडनी प्रॉब्लेम आणि परिणामी कमी वयातील मृत्यू असे अनेक धोके आहेत.

५. त्यामुळेच संतुलित योग्य आहार काय असावा याचे प्राथमिक ज्ञान सर्वांना असणे गरजेचे आहे. त्यासोबतच शाळेतच बाकी शिक्षणासोबतच प्राथमिक दर्जाचे आरोग्य (फिटनेस) कसा राखायचा, हेही शिकवायला हवे.

६. लठ्ठपणावर उपाय शोधण्यासाठी शाळांची भूमिका फार महत्त्वाची असते. कारण शाळेत मुलांना खेळण्यासाठी मैदान असते. अर्थात कित्येक शाळांना मैदानेच नाहीत, तर थोडेफार मोकळे आवारही नाही. त्यांनी त्यावर उपाय शोधायला हवा.

७. अन्नातून माणसाला कर्बोदके, प्रथिने, जीवनसत्त्वे, क्षार, मेद, तंतुमय या घटकांची पूर्तता होते; परंतु हे सर्व घटक प्रत्येकाच्या शरीरानुसार कोणते व किती प्रमाणात घ्यावेत याचा संतुलित मेळ बसवून घ्यावा लागतो. आहार योग्य वेळी घेऊन तो शारीरिक कष्ट अथवा हालचाली-व्यायाम करून पचवावा. झोपेच्या वेळाही पाळाव्या लागतात, म्हणून आपला बॉडी मास इंडेक्स कॅल्क्युलेट करून आहाराचे नियोजन करायला हवे.

# शेततळे बांधायचे असेल तर, जागा कशी असायला हवी? जाणून घ्या सविस्तर

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

शेततळ्यासाठी योग्य जागा निवडणे खूप महत्त्वाचे आहे. शेततळ्याची जागा निवडताना काही महत्त्वाचे मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे. योग्य जागा निवडल्यास शेततळे अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे शेततळ्यासाठी जागा निवडताना कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, हे समजून घेऊयात...

**शेततळे जागा निवडीचे निकष**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

१. ज्या शेतकऱ्यांच्या शेतात शेततळे खोदायचे किंवा तयार करावयाचे आहे, त्या शेतकऱ्यांचे जमीन धारण क्षेत्र, एकूण जमीन, घेतले जाणारी पिके याशिवाय उपजीविकेचे साधन, सिंचनाच्या सोई, सरासरी पडणाऱ्या पावसाचे प्रमाण, जमिनीचा प्रकार, जमिनीची साधारणतः खोली इत्यादी बाबीची माहिती जाणून घेणे महत्वाचे आहे.

२. जागा अशी निवडावी जेणेकरून कमीत कमी खोदकामामध्ये जास्तीत जास्त पाणीसाठा होईल. म्हणजेच, खड्ड्यातील जागा निवडावी. त्यामुळे कमी खर्चात जास्त पाणीसाठा होईल.जमिनीचा प्रकार, खोली व अस्तरीकरणाची आवश्यकता आहे की नाही याबाबत निश्चिती करावी.

३. शेततळ्यात पाणी साठविण्यासाठी शेततळ्यांच्या आकारमानाप्रमाणे धारणक्षेत्र उपलब्ध आहे कि नाही याची दक्षता घ्यावी.




४. शेततळ्यास सुयोग्य सांडवा असावा जेणेकरून जास्तीचे पाणी शेततळ्यातून जमिनीची धूप न करता निघून जाईल.

५. शेततळ्यात साठविलेल्या पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्याकरिता तळ्याच्या चारही बाजूस सुबाभूळ किंवा इतर झाडे लावावी, जेणेकरुन बाष्पीभवन कमी होण्यास मदत होईल.

६. शेततळ्यात पाणी येण्यासाठी सुयोग्य आकाराचे पाणी प्रवेशद्वार असावे जेणेकरून कमी गाळाची माती शेततळ्यात येईल व शेततळे गाळाने भरणार नाही. शेततळ्यांच्या पाणी प्रवेशद्वारावर गाळ चाळण संयंत्र बसावे जेणेकरुन सोबत आलेला गाळ थांबविला जाईल व शेततळ्यात गाळ जमा होणार नाही.जमिनीचा प्रकार, खोली व अस्तरीकरणाची आवश्यकता आहे की नाही याबाबत निश्चिती करावी.

७. शेततळी तयार करण्याकरिता निवडलेली जागा रेताड किंवा मुरमाड असल्यास शेततळ्यास अस्तरीकरण करणे जरूरीचे असते. तसेच याबाबीचाही विचार करून जमिनीचा प्रकार, खोली व अस्तरीकरणाची आवश्यकता आहे की नाही याबाबत निश्चिती करावी.

**– डॉ. किशोर घरडे, डॉ. यत्नेश बीसेन, डॉ. प्रशांत गावंडे,** मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.

# दहावीत नापास झालेल्यांना अकरावीत घेता येणार प्रवेश, पर्याय काय?

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१३अमरावती–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. यंदा महाराष्ट्र बोर्डाचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के इतका लागला आहे. यंदाही दहावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली असून मुलींचा निकाल ९६.१४ टक्के इतका लागला आहे. तर मुलांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.३१ टक्के इतकी आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषद घेत याबद्दलची माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र बोर्डाकडून दहावीत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना कोणकोणते पर्याय देण्यात आले आहेत, याबद्दलची माहिती दिली आहे.

दहावीतील बोर्डाच्या परीक्षेत नापास झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार किंवा गुणसुधार योजनेनुसार अकरावीत प्रवेश करता येणार आहे. बोर्डाने याबद्दलची संपूर्ण माहिती दिली आहे. महाराष्ट्र बोर्डाने श्रेणी सुधार किंवा गुणसुधार योजना सुरु केली आहे. या परीक्षेत सर्व विषयात पास झालेला विद्यार्थी यानंतरच्या तीन परीक्षेसाठी पात्र होऊ शकतो. फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये पास झालेला विद्यार्थी हा जून जुलै २०२५ परीक्षा, फेब्रुवारी मार्च २०२६ आणि जून जुलै २०२६ च्या परीक्षेला श्रेणी सुधारतंर्गत या तिन्ही परीक्षेसाठी किंवा तिन्हीपैकी एका परीक्षेसाठी तो पुन्हा प्रविष्ठ होऊ शकतो, असे शरद गोसावी



यांनी म्हटले.

दहावी नापास झालेला विद्यार्थी अकरावीला कसा घेईल प्रवेश?

तसेच दहावीसाठी -ढघढ लागू केली आहे. जर एखादा विद्यार्थी एक किंवा दोन विषयांत अनुत्तीर्ण झाला तरी त्याला ११ वीमध्ये प्रवेश दिला जातो. याला रश्रश्रुेशव ीं ज्ञशशर्ीिंशिीि म्हणजेच -ढघढ दिली जाते. यानुसार तो विद्यार्थी अकरावीत ॲडमिशन घेऊ शकतो. मात्र बारावीत प्रवेश घेण्यापूर्वी त्याला दहावी उत्तीर्ण होणे गरजेचे असेल. हा विद्यार्थी जून-जुलैची २०२५ किंवा फेब्रुवारी मार्च २०२६ ची परीक्षा जर तो उत्तीर्ण झाला आणि अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झाला तर तो बारावी परीक्षेला प्रवेश घेण्यास पात्र ठरु शकतो, असेही शरद गोसावींनी म्हटले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १४ मे २०२५ शहर/ग्रामिण


# मेळघाटातील बासपाणीत पाणी नाही...

## जलजिवन मिशन ठरले पांढरा हत्ती

### पिण्याच्या पाण्याचा सिंचनासाठी उपयोग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४धारणी,**

धारणी शहराला लागून असलेल्या बासपाणी गावात गेल्या चार वर्षापासून बांधकाम झालेल्या जलजीवन मिशनच्या पाणी पुरवठा योजनेतून आदिवासींना पाणी मिळणे अशक्य झालेले आहे. गावाचे नाव बासपाणी असले तरी ४२ लाख ५३ हजार रूपये खर्चुन जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना साकारण्यात आली. मात्र, पाणी मिळालेले नाही. जुन्या विहिरींवर पोहचुन आदिवासींना पिण्याचे पाणी आणावे लागत आहेत.

**धारणी शहराचे २ कि.मी अंतरावरील**

बासपाणी गावात २०२२ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना व घरोघरी नळ कनेक्शन देण्यात आले. मात्र, विहिरीतून टाकी पर्यंत पोहचले नाही. चुकीचे लेआऊट आणि जीएसडीचा खोटा अहवाल निकृष्ठ बांधकामामुळे योजना सुरूच झालेली नाही. या विषयी सामाजिक कार्यकर्ता प्रल्हाद चतुर यांनी आ. केवलराम काळे यांना बाबतीत सर्व माहिती देऊन लेखीतक्रार सुध्दा केली होती. तरी मात्र संबधीत विभागामार्फत कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसल्याने जलजीवन योजनेत एखादा कंपू कार्यरत अखल्याची शंका निर्माण झालेली आहे. ग्रामिण पाणी पुरवठा विभागाचा गैर कारभार यासाठी

जवाबदार असून योजना सुरू न होता उन्हाळ्यात बासपाणी गावात पेयजल संकट निर्माण झालेली आहे. विहिरीचे बांधकाम सुरू असताना पण आदिवासींनी तक्रार केली होती, हे विशेष.

#### पाणी पिण्यासाठी नव्हे सिंचनासाठी

बासपाणी गावातील पाणी पुरवठा योजनेचे पाणी नागरिकांना अप्राप्त असले तरी विहिरी जवळच्या शेतांना मात्र सिंचनासाठी उपलब्ध होत आहे. अजब-गजब मेळघाटातील हा प्रकार पण आगळा-वेगळा आहे. पाण्याच्या टंचाईसाठी ग्रामसेवक आणि पदाधिकारी जवाबदार आहेत. तर पाण्याचा दुरूपयोगासाठी सुध्दा खबडब झाल्याची चर्चा आहे. सिंचनासाठी पाण्याचा उपयोग कसा होत आहे. या बाबतीत ग्रामस्थांनी लाईव फोटो पण आमच्या प्रतिनिधीस उपलब्ध केलेला आहेत. मेळघाटात जे होईल ते नवलच. जलजीवन मिशन मधील अनेक गावात अजब-गजब गैर प्रकार उघडकीस येणार आहे.

## अमरावती विभागात कॉपीच्या एकाही प्रकरणाची नोंद नाही

### राज्यात कॉपी प्रकरणी ३७ केंद्र दोषी नऊ विभागात मिळून ९३ घटनांची नोंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

राज्यात एकूण नऊ विभागामध्ये ५१३० केंद्रावर दहावीची परीक्षा पार पडली. त्यातील ३७ केंद्र कॉपी प्रकरणात दोषी आढळली असून, या केंद्रांवर एकूण ९३ घटना घडल्याची नोंद झाली आहे. तसेच सहा एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी मंगळवारी दिली. तसेच दोषी केंद्रांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, कॉपी प्रकाराला आळा चालण्यासाठी राज्यात २० ते २६ जानेवारी वा काळात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले होते. ५ हजार १३० पैकी ७०१ केंद्रांवरील सर्व कर्मचारी बदलण्यात आले होते. तब्बल २७१ भरारी पथके आणि प्रत्येक केन्द्रावर बैठी पथके नेमवत अनुचित प्रकार घडू नये यासाठीची आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती.तसेच दोषी केंद्रांची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल,


सर्व खबरदारी घेऊनही ३७ केंद्रावर अनुचित प्रकार झाल्याचे निर्दर्शनास आले. यात विभागनिहाय विचार करता सर्वाधिक छत्रपती संभाजीनगर विभागात १३ केंद्रावर कॉपीच्या ३७ घटना घडल्या. त्या पाठोपाठ नागपूर विभागात ७ केंद्रांवर २२ घटना, पुणे विभागात ७ केंद्रांवर १७ घटना, लातूर विभागात ७ केंद्रांवर १३ घटना आणि मुंबई विभागात ३ केंद्रावर ४ घटना घडल्या आहेत. कोल्हापूर, अमरावती, नाशिक आणि कोकण विभाग निरंक आहे. एफआयआर दाखल झाल्याच्या घटना पाहता नागपूर विभागात २, नाशिक २, छत्रपती संभाजीनगर १ आणि अमरावती येथील १ नोंद दिसून येत आहे.

## पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची नागपूरला बदली



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती** – अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांची नागपूर येथे पोलीस सहआयुक्तपदी बदली झाली असून त्यांच्या जागेवर पोलीस आयुक्त म्हणून कोण येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अमरावती शहराचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी ऑक्टोबर २०२२ रोजी पदभार स्विकारला होता. त्यानंतर त्यांनी शहरातील गुन्हेगारीवर वचक निर्माण करून शहरातील गुन्हेगारीला आळा बसविण्याकरीता सातत्याने प्रयत्न केले. दरम्यान एजीपी म्हणून त्यांना पदोन्नोती मिळाली होती. त्यानंतर त्यांनी अमरावती शहरात अडीस वर्ष सेवा दिल्यानंतर मंगळवारी रात्री त्यांच्या बदलीचे आदेश आयुक्तालयात धडकले. अमरावतीला पोलीस आयुक्तपदी कोण येणार याकडे सर्वाचे लक्ष लागले आहेत.





## रुद्रेश जोशी याचे घवघवीत यश

श्यामनगर स्थित रहिवासी ज्ञानमाता हायस्कुल चा विध्यार्थी रुद्रेश प्रफुल जोशी याने १० वीत ९६.२० टक्के मार्क मिळवून घवघवीत यश मिळवले असून त्याने आपल्या यशाचे क्षेय आई,बाबा,तसेच शिक्षक वृंदाना दिले.जोशी कुटुंबातील सर्व सदस्य मंडळींनी रुद्रेश याचे अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.

## 'तो' राखेचा ढिगारा अनधिकृतच,आ. खोडके दाम्पत्यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

### प्रत्यक्ष स्थळाच्या पाहणीनंतर आमदारांचा संताप अनावर, नागरिकांच्या जीवाची कुणाला पर्वा आहे का?

**मंगेश तायडे**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नांदगाव पेठ**– कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता महामार्गावरील उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी रहाटगाव-वडगाव मार्गावर लाखो टन साठवणूक केलेली राख ही अनधिकृत असल्याचे आमदारांच्या पाहणी दरम्यान उघड झाले असून राखेच्या उडणाऱ्या कणांमुळे दररोज अनेक अपघात घडत असून देखील प्रशासनाने याप्रकरणी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याने आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी महसूल, प्रदूषण, पर्यावरण व महानगरपालिका प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.प्रत्यक्ष पाहणीदरम्यान कंत्राटदाराने केलेल्या अनेक चुकांमुळे आमदारांचा संताप अनावर झाल्याचे दिसून आले.

नागपूर-अमरावती मार्गावरील रहाटगाव रिंग रोड टी पॉइंटजवळ उड्डाणपुलाच्या कामासाठी वापरली जाणारी राख उघड्यावर साठवून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात आता प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. आमदार सौ.सुलभा खोडके,आ. संजय खोडके यांच्या संयुक्त पाहणीनंतर



याप्रकरणी नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया गतिमान झाली आहे. परिसरातील खुल्या जागेत मोठ्या प्रमाणात राख साठवली गेली होती. यामुळे परिसरात वायू प्रदूषण वाढून नागरिक, व्यावसायिक आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, एनएचएआयच्या अधिकाऱ्यांनी फक्त बांधकाम साहित्य साठवण्याची परवानगी घेतली होती, पण प्रत्यक्षात राख व उत्खनन सामग्रीचा बेकायदेशीर साठा करण्यात आल्याचे पाहणीतून स्पष्ट झाले.

या गंभीर निष्काळजीपणाबद्दल तहसीलदार विजय लोखंडे यांनी संबंधितांना लवकरच नोटीस बजावण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनीही २४ एप्रिल रोजी राख हटवण्याचे आदेश देण्यात आले होते, तरीही दुर्लक्ष झाल्याने आता कठोर पावले उचलली जातील, असा इशारा दिला.

प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी संजय पाटील आणि महापालिकेचे पर्यावरण अधिकारी महेश देशमुख यांनीही ही कारवाई फौजदारी स्वरूपाची ठरू शकते, असे नमूद केले. राखेचा ढिगार निर्जन ठिकाणी हलवण्याची आवश्यकता असून, अशा प्रकारे नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या निष्काळजी वृत्तीला प्रशासन मुळापासून थांबविण्याच्या तयारीत आहे.

#### माध्यमांमधील बातम्यांची घेतली दखल

मागील तीन आठवड्यापासून माध्यमांनी ओव्हरलोड,उडणारी राख तसेच अनधिकृत केलेल्या राखेच्या ढिगाऱ्याबाबत वृत्तमालिका सुरू ठेवली.या गंभीर प्रकरणाची प्रशासनाने कवडीची दखल घेतली नाही अखेर माध्यमांमधील वृत्ताची दखल घेऊन शनिवारी आ. सुलभा खोडके व आ. संजय खोडके यांनी राखेचा ढिगारा असलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली आणि नागरिकांच्या जीवाशी खेळणारा गंभीर प्रकार समोर आला.

## एकाच दिवशी तीन निकाल जाहीर

### मिठाईच्या दुकानांमध्ये पुरवठ्यापेक्षा वाढली अधिक मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

मंगळवार हा निकालवार ठरला आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीचा निकाल मंगळवारी घोषित होणार हे ठरले होते. परंतु, केंद्रीय शिक्षण मंडळ म्हणजेच सीबीएसईने बुधवारी बारावी आणि दहावीचा निकाल जाहीर आश्चर्याचा धक्का दिला. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचीही तारांबळ उडाली आहे.

निकाल जाहीर होताच विद्यार्थ्यांनी शाळांमध्ये धाव घेतली आहे. शहराच्या अनेक शाळांमध्ये मोठी गर्दी पाहायला मिळाली.

परंतु, यावर्षी आश्चर्याची बाब म्हणजे एकाच दिवशी तीन परीक्षांचे निकाल जाहीर झाल्याने त्याचा परिणाम मिठाईच्या व्यवसायावर झाल्याचे पाहयला मिळाले. निकाल जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांचे कौतूक म्हणून आप्तेष्ट आणि शाळांमध्ये मिठाई वाटली जाते. एकाच दिवशी तीन निकाल जाहीर झाल्याने अचानक मिठाईची मागणी वाढली असून मंगळवारी अमरावती शहरात लाखोंचा व्यवसाय झाल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे शाळांच्या नजीक असलेल्या मिठाईच्या दुकानांमध्ये पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक झाल्याने व्यवसायिकांचीही तारांबळ उडाल्याचे चित्र होते.



## डॉ. प्रतीक्षा राठोड यांना आचार्य पदवी प्रदान

### दत्ता मेघे आरोग्य शिक्षण आणि संशोधन विद्यापीठ वर्धा येथे पदवी प्रदान सोहळा थाटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती** – अमरावती- एम. आर .एच. इ .आर. डिम्ड.टू बी युनिव्हर्सिटी वर्धा विद्यापीठात सोळावा दीक्षांत समारंभ मोठ्या थाटात पार पडला. समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून सर्जन व्हाईस ऍडमिरल डॉक्टर आरती सरिन-तडच,तडच्, डॉक्टर प्रीती अदानी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने संपूर्ण समारंभ गौरवशाली ठरला. यावेळी डॉ.प्रतीक्षा पांडुरंग राठोड यांना आधुनिक गर्भसंस्कार तसेच नियमित गर्भ काळातील निगा या दोन प्रकारांच्या तुलनात्मक अभ्यासाचा मातृत्व व गर्भातील परिणामांवर प्रत्यक्ष परिणाम मोजण्याचा प्रायोगिक अभ्यास या



विषयावरील संशोधनासाठी पी.एच.डी .पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. प्रतीक्षा राठोड यांनी आपल्या यशाचे श्रेय वडील पांडुरंग राठोड, आई बबीता राठोड, भावंडे तसेच विद्यार्थी,रुग्ण, व दत्ता मेघे आरोग्य शिक्षण आणि संशोधन विद्यापीठ वर्धा यांना दिले आहे.

त्यांच्या अथक मेहनतीचा आणि समर्पणाचा हा क्षण अत्यंत गौरवाचा ठरला असून त्यांच्यावर सर्वीकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# राज्याला रेल्वे फाटकमुक्त करणार: मुख्यमंत्री

## नागपुरातील १० पुलांचेही लवकरच होणार उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

महारेलची निर्मिती करताना आम्ही राज्याला रेल्वे फाटकमुक्त करण्याचे ध्येय समोर ठेवले होते. महारेलने राज्यात ३२ पूल पूर्ण केले असून, २०० हून अधिक ठिकाणी काम सुरू आहे. उत्तम तंत्रज्ञान वापरून त्यांनी गतिशीलतेने काम केले. नागपुरातही १० पुलांचे काम पूर्ण झाले असून, लवकरच त्यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे, असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईतील रे रोड केबल स्टेड ब्रिज व टिटवाळा रोड ओव्हर ब्रिजचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी रात्री लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. रे रोड ब्रिज हा मुंबईतला पहिला केबल स्टेड रोड ओव्हर ब्रिज ठरला आहे. मुख्यमंत्री म्हणाले, अतिशय विक्रमी वेळेत महारेलने रे रोड उड्डाणपूल पूर्ण केला. सन १९१० मध्ये हा पूल उभारण्यात आला होता. या पुलाचे काम करताना वाहतुकीला कमीत कमी अडथळा होईल याची काळजी घेत महारेलने काम पूर्ण केले. केवळ पूल म्हणून न बघता शहराचे मूल्य वाढवणारी वास्तू आहे, असे समजून महारेलचे एमडी राजेश कुमार जयस्वाल यांनी काम केले आहे.

यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार मनोज जामसुतकर, बाल हक्क आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शाह, आ. चित्रा वाघ, आ. प्रवीण दरेकर, आ. प्रा. मनीषा कायंदे, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल उपस्थित होते.

### विशेष आर्किटेक्चरल एलईडी थीम लाइटिंग

मुंबई आणि नागपूर येथे महारेल निर्मित केबल स्टेड उड्डाणपुलावरही दुरून नियंत्रित अशी 'विशेष आर्किटेक्चरल एलईडी थीम लाइटिंग' वापरली गेली आहे. त्यामुळे या उड्डाणपुलाच्या सौंदर्यात भर पडून परिसराची शोभादेखील वाढणार आहे. भविष्यात या पुलांवरील विजेचा खर्च कमी करण्यासाठी (ऊर्जा वापर) महारेल प्रत्येक पुलासाठी पारंपरिक सौरऊर्जेचे नियोजनदेखील करीत आहे.

### वाहतूक कोंडी फुटणार

नवीन पूल वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवाशांना जलद, सुरक्षित आणि अधिक कार्यक्षम वाहतूक अनुभव देण्यासाठी महत्त्वाचे ठरतील, असा विश्वास महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल यांनी व्यक्त केला.



# विद्यार्थी सुरक्षेची जबाबदारी शाळांची; शासन निर्णय जारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

बदलापूरच्या शाळेतील विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या निवृत्त न्यायाधीश साधना जाधव व डॉ. शालिनी फणसाळकर जोशी यांच्या समितीने सरकारला विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात शिफारशी सादर केल्या आहेत. त्यानुसार लैंगिक गुन्ह्यापासून वा इतर अत्याचारापासून बालकांचे संरक्षण करणे, ही शाळांची जबाबदारी असेल, असा निर्णय मंगळवारी शासनाने जारी केला आहे. बदलापूर घटनेनंतर राज्यभरातून संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर शाळेतील विद्यार्थी सुरक्षा धोरणाच्या निश्चितीसंदर्भात शासनाने तज्ज्ञ समिती नेमली होती. त्या समितीच्या शिफारसीनुसार शासनाने मंगळवारी धोरण जाहीर केले आहे. लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण २०१२ कायद्यानुसार १८ वर्षे वयोगटापर्यंत कोणत्याही बालकावरील अत्याचार होण्यापासून त्यांचे संरक्षण करणे, ही त्या त्या शाळांची जबाबदारी असेल. यासंदर्भातील माहिती शिक्षण संस्था व्यवस्थापन तसेच शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापकांनी स्थानिक पोलिस ठाणे किंवा विशेष किशोर पोलिस पथकाला तातडीने कळवणे आवश्यक आहे. असे न केल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित सर्व घटक कारवाईस पात्र ठरतील, अशा इशाराही देण्यात आला आहे.लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या निवृत्त न्यायाधीश साधना जाधव व डॉ. शालिनी फणसाळकर जोशी यांच्या समितीने सरकारला विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात शिफारशी सादर केल्या आहेत.



### शाळा व्यवस्थापनाने आता हे करणे अनिवार्य

शिक्षण अधिकाऱ्यांनी सर्व शाळांना बालकांचे संरक्षण कायदा २०१२ बाबत एका महिन्याच्या आत माहिती देऊन जनजागृती करावी.

शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना तक्रार करण्यास प्रवृत्त करावे. त्यासाठी मुलांमध्ये जागृती करावी.

शाळेत सूचना फलक मुलांना दिसेल, समजेल, अशा पद्धतीने भिंतीवर लावावा.

बालकांवर होणाऱ्या अत्याचाराची माहिती संबंधित हेल्पलाइन वा संकेतस्थळावर द्यावी.

प्रत्येक शाळेत एक शिक्षक समुपदेशक नेमावा आणि त्याद्वारे विद्यार्थ्यांचे समुदेशन करावे.

पालक - शिक्षक बैठकीत जनजागृती करावी.

# श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात १५ मे रोजी नोंदलेखन कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती :** मराठी भाषा विभाग महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबईव श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती याचा संयुक्त विद्यमाने गुरुवार १५ में रोजी मराठी विश्वकोश नोंद लेखन कार्यशाळाचे आयोजन स्थानिक श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती येथील सभागृहात करण्यात आले आहे.

नोंदलेखन कार्यशाळेचे उद्द्घाटन सकाळी १० वाजता महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ रवीद्र शोभणे यांच्याहस्ते होणार असून अध्यक्षस्थानी श्री

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबईचे आयोजन

शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. जयवंत उपाख्य भय्यासाहेब पाटील पुसदेकर हे राहतील, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिका डॉ. प्रभा गणोरकर, म. रा. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सचिव डॉ. शामकांत देवरे हे प्रामुख्याने उपस्थित राहतील.

उद्द्घाटन सोहळ्यानंतर द्वितीय सत्रात महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक संतोष गेडाम व कौन्सिल फॉर टीचर एज्युकेशन फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष व प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. के. एम.भांडारकर हे या नोंदलेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत.तृतीय सत्रात उपस्थित मान्यवर प्रतिनिधींचे चर्चासत्र होईल. यानंतर प्रमाणपत्र वितरण व कार्यक्रमाचा समारोप होईल.

या एकदिवसीय कार्यशाळेत महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी व शिक्षण प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, अशी विनंती प्राचार्य डॉ. विनय राऊत व कार्यक्रमाचे समन्वयक तथा महाविद्यालय विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय खडसे यांनी केली आहे.

# आत्महत्या प्रकरणात पतीला सात वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती–** दोन वर्षाच्या मुलीसह पत्नीने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याप्रकरणी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. ५) एस.एस. पाटील यांच्या न्यायालयाने मुकेश विष्णुजी अंजनकर (वय ४७ रा. कोहळा जटेश्वर, ता. नांदगाव खंडेश्वर) याला सात वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. आरती मुकेश अंजनकर असे मृत महिलेचे नाव आहे.

दाखल दोषारोप पत्रानुसार, आरतीचे मुकेशसोबत लग्न झाले होते. त्यांना एक मुलगी होती. पती व सासरच्या लोकांनी आरतीला मानसिक व शारिरिक त्रास देणे सुरू केल्यामुळे आरती २५ सप्टेंबर २०१८ रोजी दोन वर्षाच्या मुलीला घेऊन घरातून निघून गेली. २७ सप्टेंबर रोजी सकाळी मुकेशचा मोठा भाऊ शेतात गेला असता त्याला आरती व दोन वर्षाच्या मुलीचा मृतदेह पाण्यात तरंगताना दिसला होता. आरतीजवळ सुसाईड नोट मिळाली. नोटमध्ये आरतीने पतीसह तीघांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे नमुद केले होते. लोणी पोलिसांनी आरतीचा भाऊ प्रशांत मधुकर काटकर (वय ४६ रा. शेलोडी. ता. दारव्हा, जि. यवतमाळ) यांच्या तक्रारीवरून पतीसह तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.एस. पाटील यांच्या न्यायासनासमक्ष खटल्याची सुनावणी झाली. सरकारी व बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपी मुकेश विष्णुजी अंजनकर याला दोषी ठरवत त्याला सात वर्ष सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच दोघांना निर्दो ष सोडण्यात आले. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त शासकिय अभियोक्ता अॅड. सुनीत घोडेस्वार यांनी युक्तीवाद केला.



# युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत यांच्या अडचणीत वाढ, युवकाला धमकी, जातीवाचक शिवीगाळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नागपूर :** महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांच्या विरुध्द प्रशांत प्रकाश गायकवाड यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. रोजंदारी कामगाराचे पैसे मागायला आलेल्या एका युवकाला जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची ही तक्रार आहे. कुणाल राऊत यांच्या सांगण्यावरूनच ही धमकी दिल्याच्या दावा तक्रारदार युवकाने केला आहे. गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीनुनसार, ते कुणाल राऊत यांच्याकडे रोजंदारी कामगारांचे पैसे मागायला त्यांच्या घरी गेले होते.बाहेर उभे असताना गुजरात पासिंगच्या कारमधून अभिषेक वर्धन सिंग व त्याचे तीन ते चार साथीदाराने आपल्याला अडवले. सिंग हा राऊत यांच्या निकटवर्तीय मानला जातो. त्याने आपल्याला शिवीगाळ केली. नंतर गाडीत बसलेल्या एका युवकाने आपल्याला पिस्तूल दाखवत मोबाईल हिसकावून घेतली, असे तक्रारीत म्हटले आहे. तसेच मोबाईलवर गुगल लोकेशन टाकून त्या जागेवार थांबायला सांगितले. थोड्या वेळाने सीताबर्डी पोलीस ठाण्यातून आपल्याला फोन आला. 'कुणाल राऊत यांनी तुमच्या विरुद्ध तक्रार केली असून तत्काळ पोलीस ठाण्यात हजर व्हा' असे सांगितले. अभिषेक सिंगने आपल्याला 'तुझे ऐसे झुठे केस में फसाऊंगा की जेल मे सडा राहेगा' अशी धमकी दिल्याचेही प्रशांत याने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. तसेच 'नागपूर पोलिस मेरेसे डरती है' असेही त्याने धमकावले. त्यामुळे आपण घाबरून तत्काळ गाडीने मुंबईला निघून गेलो. वाटेत असताना अभिषेक सिंगने अनेक फोन केले. 'तू कही भी रहे तुझे उठाके लेके आऊंगा, जल्दी वापस आजा' अशा पुन्हा धमक्या त्याने दिल्या. त्यामुळे आपण आपल्या घराजवळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील मोहपाडा पोलीस ठाण्यात अभिषेक सिंग व त्याच्या साथीदाराच्या विरोधात अॅट्रोसिटीची तक्रार नोंदवली असल्याचेही गायकवाड याने सांगितले आहे. तसेच त्याने 'माझ्या जीवाला धोका आहे, मला संरक्षण द्यावे' अशी विनंतीही केली असून मोबाईल आलेल्या कॉलचे स्क्रिन शॉटही त्याने आपल्या तक्रारीसोबत जोडले आहे. कुणाल राऊत यांच्या सांगण्यावरून या धमक्या देण्यात आल्याचा दावाही प्रशांत गायकवाड याने केला आहे.



# राज्यात २८५ विद्यार्थ्यांना ३५% टक्के ; अमरावती मध्ये २८ विद्यार्थी

## दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकणाचा निकाल सर्वाधिक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती–** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेला इयत्ता दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यंदाचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला आहे. सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा लागला आहे. यंदाही दहावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. तर यंदाच्या वर्षी राज्यात २८५ विद्यार्थ्यांना ३५% टक्के मिळाले आहेत.



राज्यात २८५ विद्यार्थ्यांना ३५% टक्के

राज्यात ३५ टक्के मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल सांगायचं झालं तर, पुणे - ५९ विद्यार्थी, नागपूर - ६३ विद्यार्थी, छत्रपती संभाजी नगर - २८ विद्यार्थी, मुंबई - ६७ विद्यार्थी, कोल्हापूर - १३ विद्यार्थी, अमरावती - २८ विद्यार्थी, नाशिक - ९ विद्यार्थी, लातूर - १८ विद्यार्थी, कोकण - ० विद्यार्थी, एकूण २८५ विद्यार्थ्यांना ३५ टक्के गुण मिळाले आहेत.

# अनिसंच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी प्राचार्य स्मिता देशमुख यांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती :**

महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्षपदी प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख तसेच कार्याध्यक्षपदी प्रफुल्ल कुकडे यांची निवड करण्यात आली आहे.

जिल्हा प्रधान सचिव म्हणून गायत्री आडे, तर राज्य निरीक्षक म्हणून सुभाष गौरखेडे यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ही निवड पुढील २ वर्षांसाठी आहे. राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांच्या मार्गदर्शनात या कार्यकारिणीचे गठन केले.

अन्य पदाधिकाऱ्यांमध्ये जिल्हा उपाध्यक्ष म्हणून प्रमोद कोळमकर व प्रा. सतीश तराळ यांचाही या कार्यकारिणीत समावेश आहे.कार्यकारिणीत विज्ञान जाणीव विभागप्रा. संजय चोपडे, विवेक वाहिनी प्रा.डॉ. मंदा नांदुरकर, सांस्कृतिक विभाग-विजय डवरे, सोशल मीडिया प्रवीण गुल्हाने, कायदेशीर सल्लागार एल. जी. आडे, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून आशिष देशमुख, कांचन रूपाने यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी माजी जिल्हा कार्याध्यक्ष गायत्री आडे, राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार आदी उपस्थित होते.

# प्रेयसीवर चाकूहल्ला करणाऱ्या दोघांना अटक

## प्रेयसीवर नागपुरात इलाज सुरू प्रकृती चिंताजनक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती –** प्रियकरावे लान जुळल्यानंतर विभक्त राहणाऱ्या विवाहित प्रेयसीचा विरोध असल्यामुळे प्रियकराने साथीदाराच्या मदतीने तिला तपोवनेश्वर नेले आणि तिच्या पोटावर, मानेवर आणि छातीवर चाकूने सपासप वार करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना रविवारी दुपारी फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली या घटनेत पोलिसांनी तत्काळगुन्हा दाखल करून दोघांना अटक केली. राहुल तंबोले आणि पीयूष हर्षअशी अटकेतील युवकांची नावे आहेत.

पीडित विवाहित महिलेचे पतीसोबत पटत नसल्यामुळे ती तिच्या १८ वर्षाच्या मुलासोबत राहत होती. २ ते ३ वर्षांपूर्वी तिची ओळख राहुल तंबोले सोबत झाली आणि त्यांच्यात प्रेमसंबंध जुळले. तेव्हापासून ती राहुलसोबत रिलेशनमध्ये समाधाननगर येथे राहत होती आणि तिचा मुलगासुध्दा सोबतच राहत होता. दोघेही पती-पत्नी सारखे राहत होते. दरम्यान काही दिवसांआधी राहुलचे एका मुलीसोबत लग्न जुळले. याबाबत तिला माहिती मिळताच त्यांच्यात दुरावा निर्माण झाला. त्यामुळे राहुलने तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केलाः परंतु ती ऐकत नव्हती. राहुलच्या लग्नाची तारीख जवळ होती आणि रविवारी सायंकाळी त्याच्या हळदीचा कार्यक्रमसुध्दा होताः परंतु प्रेयसी काही तरी करणार या भीतीने राहुलने तिला विश्वासात घेतले आणि दुपारी तिला घेऊन दुचाकीने तपोवनेश्वर घेऊन गेला.

त्या ठिकाणी थांबून समजविण्याचा प्रयत्न केलाः मात्र प्रेयसी समजत नसल्याने आपल्या मित्रांसोबत प्रेयसीवर वर चाकूने सपासप वार केले व तिथून फरार झाला. पोलिसांनी तत्काळ महिला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथून तिला नागपूरला हलविण्यात आले.

आरोपी राहुल प्रकाश तंबोले (३०) रा. समाधाननगर, खापर्डे बगिचा व शिवसागर उत्तम हर्षे (३६) रा. नमुना गल्ली यांना ताब्यात घेवून त्यांनी गुन्ह्यांची कबुली दिली. ही कारवाई पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात पोनि. निलेश करे, निलेश गावंडे, शशांक पवार, हरीश चौधरी, शशिकांत गवई, रोशन वहाडे यांच्या पथकाने केली.

# अमरावती महानगरपालिकेचा महापौर व अमरावती जिल्हा परिषद अध्यक्ष हा भाजपाचाच होणार - नवनीत राणा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

भारतीय जनता पार्टीच्या अमरावती शहर अध्यक्षपदी डॉ नितीन धांडे व ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी रविराज देशमुख तसेच प्रभुदास भिलावेकर यांची निवड राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडवणीस प्रदेशाध्यक्ष माननीय चंद्रशेखर बावनकुळे कार्यकारी अध्यक्ष रवींद्रजी चव्हाण डॉ अनिल बोंडे भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली या दोन्ही शहर व ग्रामीण जिल्हाध्यक्ष यांनी भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या गंगा सावित्री निवासस्थानी भेट देऊन त्यांचे धन्यवाद मानले व त्याप्रमाणे भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी डॉ नितीन धांडे व रविराज देशमुख प्रभूदास भिलावेकर यांचा याप्रसंगी औक्षवंत ,शाल श्रीफळ देऊन सत्कार केला तसेच भाजपा नेत्या मा खासदार नवनीत राणा यांनी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर जी बावनकुळे कार्यकरी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना विश्वास दिला की येणाऱ्या अमरावती महानगरपालिकेमध्ये महापौर तसेच अमरावती जिल्हा परिषदेमध्ये अध्यक्ष भाजपाचा राहील शहर तसेच जिल्ह्यामध्ये भाजपा एक नंबर वर आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन भाजपाचा झेंडा महानगरपालिका, जिल्हा परिषदेवर फडकावू असा शब्द राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडवणीस यांना नवनीत राणा यांनी दिला. नवनिर्वाचित अध्यक्षांचे गंगा सावित्री या राणा दाम्पत्यांच्या घरी सत्कार ही यावेळी करण्यात आला.

# योगाचार्य अक्षय धानोरकर यांचे प्रबळ आवाहन योग आणि सुसंस्कारांतून युवकांनी उभे करावे अजेय राष्ट्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४गुरकुंज मो.**



श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात आयोजित श्री गुरुदेव जीवन विद्या बाल सुसंस्कार शिबिरात स्वामी रामदेव जी यांचे शिष्य आणि विख्यात योगसाधक अक्षय जी धानोरकर यांनी युवाशक्तीला योग आणि सुसंस्कारांचे असीम सामर्थ्य उलगडून दाखवले. राष्ट्रनिर्मितीसाठी बलवान, चारित्र्यसंपन्न आणि समर्पित युवकांची आवश्यकता अधोरेखित करताना त्यांनी यौगिक जॉगिंग, सूर्यनमस्कार, दंडबैठक आणि प्राणायाम यांसारख्या योगसाधनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घडवले. या अभ्यासांमुळे केवळ शारीरिक स्वास्थ्यच नव्हे, तर मानसिक दृढता, एकाग्रता आणि आत्मविश्वास यांची प्राप्ती होते, यावर त्यांनी ठामपणे भर दिला.

या शिबिराला योगशिक्षक भिमराव जी सांगोले, श्री गुरुदेव मानव सेवा छात्रालयाचे अधिक्षक अमोल जी बांबल, प्रकाशन विभागाचे प्रमुख गोपाल दादा कडू आणि गोपाल महाराज गावंडे यांचे प्रेरक मार्गदर्शन लाभले. त्यांनी मुलांना योग, ध्यान आणि नैतिक मूल्यांच्या आधारे जीवनाला उदात्त दिशा देण्याचे अमूल्य तत्त्वज्ञान पटवून दिले. शिबिरात सहभागी बालकांनी प्रचंड उत्साहाने योगाभ्यासात सहभाग घेतला आणि आपल्या दैनंदिन जीवनात योगाला कायमचे स्थान देण्याचा अटल निश्चय केला.

अक्षय जी धानोरकर यांनी आपल्या ओजस्वी उद्गारांत सांगितले, योग हा फक्त व्यायाम नाही, तर तो मन, बुद्धी आणि आत्म्याला एका अखंड सूत्रात बांधणारा जीवनमार्ग आहे. आजच्या युवकांनी योग आणि सुसंस्कार अंगीकारले, तर ते स्वतःला अजेय बनवत राष्ट्रला अभेद्य सामर्थ्य आणि वैभवाच्या शिखरावर नेऊ शकतात. शिबिरातील विद्युतमय आणि प्रेरणादायी वातावरणाने मुलांच्या मनात सकारात्मकता, आत्मविश्वास आणि सशक्त भारताच्या स्वप्नांचा पाया रचला.

# नृसिंह चतुर्दशी महामहोत्सव, इस्कॉनचा २५ वा ब्रह्मोत्सव अंबानगरीत थाटात: रुक्मिणी द्वारकाधीशांच्या मुख्य विग्रहांचा ५०० किलो फुलांनी महाअभिषेक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

ईस्कॉनच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी द्वादशी व श्री नृसिंह चतुर्दशी महामहोत्सव तसेच संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित २५ वा ब्रह्मोत्सव भक्तिभाव आणि अध्यात्मिक ऊर्जेने ओथंबून गेलेल्या वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी ६ हजार भाविकांनी उपस्थित राहून नृसिंह, रुक्मिणी द्वारकाधिशांचे दर्शन घेतले. इस्कॉन अमरावतीच्या रौप्य महोत्सवाचे औचित्य साधून श्री रुक्मिणी मंगलम कथामृत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता कथा व्यास म्हणून भक्ती पद्म सौरभ प्रचारक स्वामी महाराज यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. इस्कॉन संस्थापक आचार्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचे वरिष्ठ शिष्य, कीर्तन सम्राट, त्रिदंडी संन्यासी लोकनाथ स्वामी महाराज यांची प्रेरणादायी उपस्थिती या महोत्सवात विशेष आकर्षण



ठरली. त्यांच्या दिव्य मार्गदर्शनात २ ते ११ मे दरम्यान विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

रुक्मिणी द्वादशीच्या दिवशी पहाटे श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या मंगल आरतीने दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर सामूहिक हरिनाम संकीर्तन झाले. सकाळच्या सत्रात लोकनाथ स्वामी महाराजांच्या सुमधूर वाणीतून रुक्मिणी कथामृत रसिक श्रोतृवर्गाने अनुभवले. त्यानंतर २५ व्या ब्रह्मोत्सवानिमित्त लोकनाथ स्वामी महाराजांच्या हस्ते ५०० किलो फुलांद्वारे गर्भगृहातील श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश या मुख्य विग्रहांचा अभिषेक विधी संपन्न झाला. सायंकाळी ६ वाजता संकीर्तनाद्वारे महाअभिषेक झाला. त्यानंतर १०८ भोग दर्शन आणि रुक्मिणीचे विशेष चरण दर्शन आणि रुक्मिणी द्वारकाधीश यांची महाआरती सोबतच महाप्रसादाने महाउत्सवाची सांगता झाली.

# दारापुराचे सुपुत्र आज देश सर्वोच्च न्यायासनावर- मानाचा तुरा

## नवनियुक्त सरन्याधीश मा. भूषण दादा गवई शपथ शपथ सोहळा जन्मगावी दारापुर येथे उत्साहात





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ दारापुर दर्यापूर**

दारापुराच्या पवित्र मातीने घडवलेला सुप्रसिद्ध न्यायप्रविष्ट आज सर्वोच्च शिखरावर विराजमान आहे – मा. गवई भूषण महाराज सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्याधीपदी नियुक्ती हा मात्र त्यांना सन्माननीय नसून , दारापुर गावासाठी , विदर्भासाठी आणि समाच्या मूल्यावर विश्वास ठेवण्यासाठी प्रत्येकासाठी अभिमानाचा क्षण आहे. या ऐतिहासिक आणि गौरवशाली क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी त्यांचा जन्म गाव दारापूर येथे 'शपथ शुभ सोहळा' अत्यंत उत्साहात आणि अभिमानाने करण्यात आला. संपूर्ण गावात उत्साह , प्रेरणा आणि अभिमानाची लहर उस आली होती.कार्यक्रमाची सोय भारतीय संभाजी महाराज , भारतरत्न डॉ.बाबा साहेब आणि श्री.दादासाहेब गवई यांच्या प्रतिमेच्या पूजनाने नंतर मा. भूषण दादा गवई यांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि संघर्षमय प्रवासाचा संक्षिप्त परिचय करून देण्यात आला. दिनांक २४ नोव्हेंबर १९६० रोजी जन्म झाला. भूषण दादा गवई यांनी विद्यापीठ विद्यापीठ विधी पदवी. सामाजिक उच्च शक्ती वकिली करताना त्यांनी न्यायासाठी अभ्यास केला. २००३ सान्या मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती , नंतर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या मूतीर्ती , आणि आता २०२५ मध्ये भारताचे सरयाधीश म्हणून लोकशाही स्वीकारणे – हा प्रवास गावक–यांसाठी आणि उपचारासाठी लोकशाही सहाय्यक ठरला.या अभिनंदन सोहळयात लोकशाहीचे प्राचार्य डॉ. डी. टी. इंगोले यांनी अध्यक्ष संबोधित करताना सांगितले की , दारापुराच्या पवित्र मातीने देशाला न्यायसत्ताचा दीप दिला आहे. भूषण दादा गवई साहेब साहेब कार्य हे पार्किंगी आदर्श म्हणून ठेवावे.अग्रगण्य अभिमानाने त्यांचा शपथविधी मोठ्या प्रक्षेपणाद्वारे पाहिला. कार्यक्रमात सरपंच काजलताई धंदर , उपसरपंच जमीलजी पटेल व ग्रामपंचायत सदस्य आणि धम्मपाल इंगळे ग्रामपंचायत सचिव व कर्मचारी विनायकराव गवई , विश्वंभर मारके , संजय बेलोकार , अमोल देशमुख , राजुभाऊ गवई , नंदुभाऊ भुसारी , मुकीम पटेल , आशिष बेथारिया , मनोहरराव इंगळे , जयप्रकाश घुरडे , प्रफ्फुल श्रीखंडे , हेमंत धुमाळे , प्रकाश मोहोड , मुकेश बनसोड राजेश कमळापुरे व समस्त गावकरी प्रमुख हजर होती.

कार्यक्रमाला पायनी 'मोटा गावक हजेरी लावली व या ठिकाणी नाचून आनंद व्यक्त केला . या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचलन विश्वंभर मारके यांनी केले.या संगीत कार्यक्रमाला डॉ. एस. टी. वरघट , प्रा वर्षा मोरशे , डॉ. एन. एस. घोटकर , डॉ. बी. एस. शेटे , प्रा. ए. एस. बोंबटकर , प्रा. ए. ए. चिंचमलातपुरे , प्रा. पी. एस. देशपांडे , प्रा. डी. दृश्य अष्टोनकर , प्रा. एस. डी. गफने , श्री. योगेश गोंडाणे , श्री. ए. दृश्य कालमेघ आनंद सर्ववर्ग , शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्याने उपस्थित होते.

# आशा, गटप्रवर्तकांचा २० मे रोजी संप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**




आशा शासकीय कर्मचा–यांचा दर्जा तसेच पुण्याच्या 'यशदा' मार्फत मूल्यांकन या मागणीसाठी २० मे रोजी आशा व गटप्रवर्तकांनी संपाची हाक दिली आहे. या संपात विविध कामगार संघटनांचे महासंघ तसेच सर्व क्षेत्रातील कामगार, कर्मचारी सहभागी होणार आहेत. आशा व गट प्रवर्तक यांनी स्वतःला शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळावा, यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून आंदोलन चालवले आहे. किमान वेतन लागू करा, ४ महिन्यांचे थकीत मानधन त्वरित अदा करा, कामगार विरोधी ४ श्रम संहिता आणि जनसुरक्षा विधेयक रद्द करा, यादेखील संपकर्त्यांच्या मागण्या आहेत.

देशातील सर्व केंद्रीय कामगार संघटना व केंद्रीय कर्मचारी फेडरेशन यांच्या संयुक्त कामगार संघटना, कृती समिती या आंदोलनासाठी सक्रीय झाली असून, केंद्र व राज्य सरकारच्या कामगार विरोधी धोरणाविरोधात एल्गार केला जाणार आहे. त्यात आयटकशी संलग्न 'महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गट प्रवर्तक संघटना' ही प्रमुख भूमिकेत असेल, असे संघटनेचे जिल्हा सचिव प्रफुल्ल देशमुख यांनी कळवले आहे.

# १५ ते २० मे दरम्यान भरतनाट्यम कार्यशाळा : ख्यातनाम नृत्यांगना अक्षया अय्यर देणार प्रशिक्षण-ऑनलाइन पद्धतीने चालणार वर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**



ख्यातनाम भरतनाट्यम गुरू रत्नम् जनार्दन यांच्या शिष्या व भरतनाट्यम च्या कुशल नृत्यांगना अक्षया अय्यर यांच्या द्वारे आगामी १५ ते २० मे दरम्यान भरतनाट्यम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत ऑनलाइन पद्धती ने भरतनाट्यम या भारतीय शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण व मार्गदर्शन प्रदान करणार आहेत.या कार्यशाळेत 'बिगनर बैच' अंतर्गत अदवुस व मुद्रा आणि 'एडवांस्ड बॅच' अंतर्गत शिव कीर्तनम (आनंदा नटमदुआर थिल्लई) चे ऑनलाइन प्रशिक्षण भरत नाट्यम नृत्यांगना अक्षरा अय्यर द्वारा देण्यात येणार आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी मोबाइल क्रमांक ९१५८८०८६३५ किंवा अक्षया अय्यर २००३ एट द रेट जीमेल डॉट कॉम वर संपर्क करता येईल. इच्छुकांनी या कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सुरळीत वीज पुरवठ्यास बाधा ठरणाऱ्या अनाधिकृत वीज वापरावर कारवाई करा- मुख्य अभियंता श्री अशोक साळुंके

## वीज गळती १५ टक्क्यापर्यंत कमी करण्याचे लक्ष


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

परिमंडळाची वीज वितरण हानी २९ % वरून १५ % पेक्षा कमी करणे, वीज सेवेत गुणात्मक सुधारणा करणे यासाठी परिमंडळात अनाधिकृत वीज वापरणाऱ्यांच्या विरोधात विशेष धडक मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी परिमंडळात २१० पथकाची निर्मिती करण्यात आली असून प्रत्येक पथकाला वीज चोरी पकडण्याचे उध्दीष्ट देण्यात आले आहे.

विजेचा अनाधिकृत वापर करणे हा फौजदारी गुन्हा आहे. तसेच अनाधिकृत वीज वापरामुळे महावितरणचे आर्थीक नुकसान होते, शिवाय यंत्रणेवर पडणाऱ्या अतीरिक्त ताणामुळे शॉर्टसर्कीट होणे, जंपर तुटणे, रोहित्र जळणे यामुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रमाणात वाढ होते. त्यामुळे सुरळीत वीज पुरवठ्यास बाधा निर्माण करणाऱ्यांविरोधात थेट कारवाई करण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहे.

### वीज चोरी कळवा बक्षिस मिळवा

वीज चोरीच्या प्रकरणांमुळे वीज हानीबरोबरच आर्थिक नुकसानही सोसावे लागत असल्याने या प्रकारास आळा घालण्यासाठी 'महावितरण'ने 'वीज चोरी कळवा आणि १० टक्के रक्कमेचे घसघसीत बक्षीस मिळवा',



असा उपक्रम हाती घेतला आहे, भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये वीजमीटरमध्ये जाणीवपुर्वक फेरफार करून होणा–या वीजचो–यांची माहिती असणा–यांनी पुढाकार घेत यासंबंधी माहिती द्यावी, माहिती कळविणा–याचे नाव गुप्त ठेवल्या जाईल. महावितरणच्या मोबाईल एपवर तसेच संकेतस्थळावर वीज चोरी कळविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### परिमंडळात २१० पथकाची निर्मिती

प्रत्येक शाखा कार्यलयाला एक पथक, याप्रमाणे परिमंडळाअंतर्गत अमरावती जिल्ह्यात १३० पथके आणि यवतमाळ जिल्ह्यात ८० पथके तयार करण्यात आले आहे. प्रत्येक पथकात पथक प्रमुख म्हणून शाखा अभियंता राहणार आहे. याशिवाय वीज चोरी पकडण्याच्या मोहिमेला गती देण्यासाठी वरीष्ठ अधिकारी मोहिमेत सहभागी होणार आहे.

### या ग्राहकांचीही होणार तपासणी

या मोहिमेत फॉल्टी मीटर, सरासरी वीज बिल, शुन्य वीजबिल, कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांचीही तपासणी करण्यात येणार असून मोहिमेदरम्यान वीज जोडणीच्या ठिकाणी अवैधपणे आढळणाऱ्या वीज पुरवठ्याविरूध्द विद्युत कायदा २००३ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच थकबाकी असलेल्या ठिकाणी शेजाऱ्यांकडून अनाधिकृत वीज जोडणी देण्यात आली असेल, तर त्या शेजारी ग्राहकांवरही कायदेशीर कारवाई होणार आहे.

# अमरावतीच्या सुपुत्राचे सर्वोच्च शिखरावर यश

## भूषण गवई मुख्य न्यायमूर्ती होताच वकिलांचा जल्लोष, ढोल-ताशांचा गजर



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१४अमरावती**

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून अमरावतीचे सुपुत्र भूषण गवई यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शपथ घेतली. त्यांच्या या शपथविधीचा थेट प्रसारण अमरावती जिल्हा न्यायालयातील बार असोसिएशनच्या सभागृहात दाखवण्यात आला.

शपथविधी सुरू होताच उपस्थित वकिलांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले आणि शपथ घेण्याचा क्षण येताच सर्वांनी एकमेकांना मिठाई भरवून ढोल-ताशांच्या गजरात उत्सव साजरा केला. अनेक वकिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते.आजचा दिवस आमच्यासाठी दिवाळीपेक्षा कमी नाही, असे म्हणत अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. एका सामान्य घरातून, सरळ-साध्या वकिलाच्या भूमिकेतून आज सर्वोच्च न्यायाधीश पदापर्यंत पोहोचलेल्या गवई यांच्या यशाचा अभिमान व्यक्त करत, अनेक जुन्या वकिलांनी त्यांच्यासोबत काम केलेल्या आठवणींना उजाळा दिला.आज आमच्या मातीतला मुलगा देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान झाला आहे. हे आमचं भाग्य आहे. आम्ही त्यांना वकिल म्हणून घडताना पाहिलंय, आज न्यायव्यवस्थेचं सर्वोच्च नेतृत्व करताना पाहतोय, असे म्हणत वकिलांनी एकच जल्लोष केला.बार असोसिएशनच्या आवारात ढोल, ताशे, नगारे वाजवत अनेकांनी आनंदोत्सव साजरा केला. गवई यांच्या साधेपणाचे, त्यांचं कर्तृत्व आणि संघर्षाचे किस्से चर्चेत होते.अमरावतीच्या मातीने देशाला एक कर्तबगार सरन्यायाधीश दिला. हे आमचं सौभाग्य! - अशी भावना न्यायालय परिसरात सर्वत्र व्यक्त होत होती.

# विद्यापीठांवर लादला अॅप्रेन्टिसशिप एम्बेडेड पदवी प्रोग्राम?

## शासनाची अतिरिक्त समिती : विद्यापीठांमध्ये स्वतंत्र दौरे



**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१४अमरावती**

राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने अकृषी महाविद्यालय संलग्नित महाविद्यालयांमध्ये अॅप्रेन्टिसशिप एम्बेडेड पदवी प्रोग्राम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याकरिता २१ सदस्यांची समन्वय समिती नेमली असून, या समितीच्या दौऱ्यावर येणारा खर्च मात्र विद्यापीठांना करावा लागणार आहे. आधीच विद्यापीठांची आर्थिक स्थिती नाजूक असून रिक्त पदांची मोठी समस्या असताना हा प्रोग्राम विद्यापीठांवर लादल्याची भावना निर्माण झाली आहे. ही समिती २० ते २५ विद्यापीठांत दौरे करणार असल्याने उच्च शिक्षण व्यवस्था वेठीस धरण्याचा हा प्रकार मानला जात आहे.

### विद्यापीठाच्या माथी योजना कशाला?

काही विद्वान राजभवन आणि मंत्रालयात तळ ठोकून बसले आहेत. वास्तविकता आणि वस्तुस्थिती यांचे भान न ठेवता बेभान होऊन योजनांचा रतीब विद्यापीठावर टाकत असल्याचे वास्तव आहे. अल्प मनुष्यबळ, वित्तीय अनुपलब्धता आणि नियमांची सक्ती या सर्वांच्या उपस्थितीत निर्धारित योजना शासन कशा गळी उतरवू शकतील, हे तर येणारा काळच विशद करील.

### हे तर निवृत्तांचे पुनर्वसन

ज्यांच्या कुलगुरुपदाच्या कार्यकाळात विद्यापीठांचे असलेले दर्जेसुद्धा घसरलेत, असेही विद्वत्जन संपूर्ण राज्यात दौरे काढणार आहे. २१ सदस्यांची ही इतकी मोठी समिती खरंच न्याय देऊ शकेल का? असा प्रश्न शिक्षण क्षेत्रात विचारला जात आहे. या समितीत जवळपास निवृत्तांची संख्या जास्त आहे. त्यामुळे शासनाचा हा निर्णय खुशीकरण की वशीकरण, हे कळू शकले नाही, हे विशेष.

उच्च शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी अकृषी विद्यापीठाच्या कुलसचिवांच्या नावे २९ एप्रिल २०२५ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार अॅप्रेन्टिसशिप एम्बेडेड पदवी प्रोग्राम राबविण्यासंदर्भात शासनाकडून स्थापित झालेल्या समन्वय समितीत अतिरिक्त सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत कळविले आहे. योग्य पद्धतीने कामकाज हाताळण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आल्याचे या पत्रात नमूद आहे. मात्र, या समितीच्या दौऱ्याच्या अनुषंगाने होणारा खर्च कोण, कसा करणार याबाबत काहीही उल्लेख नाही. त्यामुळे ही समिती विद्यापीठाचे आर्थिक दिवाळे काढणारी तर नाही ना? अशी शंका उपस्थित होत आहे.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील शहानूर सफारीला प्रारंभ

## जिप्सी चालकांनी भाडेवाढ करण्याच्या मागणीसाठी पुकारला होता बंद

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१४अकोला**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणारी शहानूर येथील जंगल व नरनाळा किल्ला सफारी १ मेपासून बंद होती. नरनाळा वन पर्यटन संघटनेच्या जिप्सी चालकांनी भाडेवाढ करण्याच्या मागणीसाठी बंद पुकारल्याने गेल्या १३ दिवसांपासून सफारी बंद असल्याने पर्यटकांचा हिरमोड झाला होता. यासंदर्भात अकोला जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी मध्यस्थी करून मागण्यासंदर्भात वरिष्ठांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर जिप्सी चालकांनी आपला संप मागे घेतला असून १४ मेपासून पुन्हा सफारीला प्रारंभ झाला. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट वन्यजीव विभागामध्ये नरनाळा किल्ला व शहानूर येथील जंगलाचा समावेश आहे.



नरनाळा किल्ल्याच्या पायथ्याशी शहानूर येथे वन पर्यटन केंद्र असून त्या ठिकाणावरून नरनाळा किल्ला व शहानूर जंगलासाठी सफारी सोडली जाते. गेल्या १३ दिवसांपासून ही सफारी बंद होती. विविध मागण्यांसाठी नरनाळा वन पर्यटन संघटनेने संप पुकारला होता. इंधनाचे वाढलेले दर लक्षात घेता व पर्यटन मार्गात नव्याने वाढ झाल्यामुळे शहानूर सफारीचे केवळ जिप्सी प्रवास भाडे अडीच हजारावरून चार हजार व नरनाळा किल्ला सफारीचे दीड हजारावरून अडीच हजार करण्याची मागणी संघटनेने केली.


करोना काळामुळे बंद केलेली रात्रीची सफारी व पूर्ण दिवसाची सफारी सुरू करण्यात यावी, नरनाळा परिक्षेत्रातील बफर क्षेत्रात मचाण सुरू करावे, शहानूर सफारी द्वारावरील गाईड व जिप्सी चालक यांना गणवेश व ओळखपत्र द्यावे, शहानूर सफारी मार्गावरील खासगी सर्व वाहने बंद करण्यात यावे, शहानूर सफारी द्वार ते नरनाळा किल्ला दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण होत असल्यामुळे पावसाळ्यात नरनाळा किल्ला सफारी सुरू ठेवावी, जिप्सी गाईड व जिप्सी चालक यांना प्रशिक्षण देण्यात यावे आदी मागण्यांचे निवेदन संघटनेच्यावतीने अकोट वन्यजीव विभागात ११ एप्रिलला देण्यात आले होते. या मागण्यांची दखल न घेतल्यास १ मेपासून शहानूर येथील सफारीसाठी बंद पुकारला होता.

ऐन हंगामाच्या काळात पर्यटक व वन्यजीव प्रेमींची निराशा होण्यासोबतच स्थानिकांचा रोजगार देखील प्रभावित झाला. दरम्यान, जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आंदोलक जिप्सी चालकांची बैठक घेऊन तोडगा काढण्याच्या सूचना केल्या. विविध मागण्या संदर्भात विभागीय समितीसह वरिष्ठांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देखील त्यांनी आंदोलकांना दिले. त्यामुळे हा बंद मागे घेण्यात आला. १४ मेपासून शहानूर येथील सफारी पूर्ववत सुरू झाल्याची माहिती संघटनेचे सचिव चंद्रशेखर गायकवाड यांनी दिली.

# एकता आभूषणवर आयकर विभागाची छापेमारी

## परतवाडा शोरूम व राहत्या घरी ही कागदपत्रांची तपासणी सुरु







**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

आयकर विभागाने अमरावती व परतवाडा शहरातील एकता आभूषण एकता ज्वेलर्स या सोन्या चांदी विक्रीच्या व्यापाऱ्याकडे छापेमारी केली आहे. या छापेमारीने शहरात एकच खळबळ उडाली असून सराफ व्यावसायीकांमध्ये भीतीचे वातारण पसरले आहे.

अमरावती शहरातील जयस्तंभ चौक ते कॉटन मार्केट रोडवर असलेलं एकता आभूषण तर परतवाड़ा शहरातील एकता ज्वलर्स या सोन्या चांदीच्या विक्रीकरणाऱ्या दुकानांवर आयकर विभागाने छापा घातला सकाळी ११ वाजताच्या सुमारास नागपूर ,पुन्हा आणि संभाजी नगरचे आयकर विभागाचे पथक अमरावतीत धडकले व एकाच वेळी एकता आभूषण व एकता ज्वेलर्स मध्ये छापेमारी कारवाई केली अमरावती शहरा व्यतिरिक्त परतवाडा,यवतमाळ येथे शो रुम आहेत या सोबतच एकता आभूषण चे संचालकाच्या घरी छापेमार कारवाई केली सकाळी११वाजता आयकर विभागाचे अधिकारी शोरूम वर धडकले दुपार पर्यंत हि कारवाई सुरू असून या कारवाईनंतर काय घबाड समोर येते या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अकोला, सांगली, मिरज भागात चिकनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

राज्यात मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा चिकनगुनियाचे रुग्ण वाढले आहेत. सर्वाधिक रुग्ण बृहन्मुंबई, पुणे, अकोला जिल्हा व महापालिका भागात नोंदवले गेले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे.




राज्यात १ जानेवारी २०२४ ते ७ मे २०२४ दरम्यान चिकनगुनियाचे ६०७ रुग्ण नोंदवण्यात आले होते. परंतु, यंदा १ जानेवारी २०२५ ते ७ मे २०२५ दरम्यान सारख्याच कालावधीत चिकनगुनियाचे ७१८ रुग्ण नोंदवले गेले. जिल्हानिहाय बघितल्यास पुणे, अकोला, सिंधुदुर्ग, पालघर भागात तर महापालिकानिहाय बघितल्यास बृहन्मुंबई, अकोला, सांगली, मिरज भागात सर्वाधिक रुग्ण आढळले आहे. मागील दोन वर्षात या आजाराने एकही मृत्यू झाला नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्याने नाव न टाकण्याच्या अटीवर या आकडेवारीला दुजोरा दिला.

**चिकनगुनिया कशामुळे होतो?**

चिकनगुनिया हा एक विषाणू आहे जो लोकांमध्ये डासांच्या चाव्याव्दारे पसरतो - विशेषतः एडिस इजिप्ती डास आणि एडिस अल्बोपिक्टस डासांच्या माध्यमातून. जेव्हा विषाणू असलेला डास एखाद्या व्यक्तीला चावतो तेव्हा चिकनगुनियाचा संसर्ग होतो.